MHKO100006502022

**नियमीत दिवाणी दावा क्र. १६९/२०२२**

शोभा चंद्रकांत कल्लोळी वगैरे.
// विरुध्द //
सुनिलदत्त बाबूराव कल्लोळी वगैरे.

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१८ वर त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी असे शाबीत केले काय की, त्यांच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | होय. |
| २. | वादींनी पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | होय. |
| ३. | वादींनी पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

**दावा मिळकतींचे वर्णन-**

३. मौजे हिडदूगी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथील शेतजमीन मिळकतीचे तपशिल खालीलप्रमाणे-

| सर्व्हे क्रमांक | भूमापन गट क्र. | क्षेत्र हे.आर. | आकार रुपये पैसे | यापैकी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | क्षेत्र हे. आर | आकार रुपये पैसे |
| ७० | ५०७ | ०१.४९ | ११-३१ | ००.४७ | ०४-०० |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत. (यापुढे या मिळकतीला "दावा मिळकत" म्हणून संबोधण्यात येईल).

४. वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.३, १६ व २१ येथे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेतः-

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | भूमापन क्र.५०७ चा ७/१२ उतारा. |
| ०२. | दिनांक ११/०२/१९८८ रोजीचे हमीपत्र. |
| ०३. | भूमापन क्र.५०७ चा एकत्रीकरणाचा उतारा. |
| ०४. | मालमत्ता क्र.५१३/२ चा घरठाण पत्रकाचा उतारा. |
| ०५. | मिळकत क्र.३६२ चा घरठाण पत्रकाचा उतारा. |
| ०६. | सन २०१०-११, २०११-१२, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ सालच्या कराबद्दलच्या पावत्या . |
| ०७. | मालमत्ता क्र.५१३/1 चे घरठाण पत्रकाचे उतारे. |
| ०८. | मिळकत क्र.५१३ चा असेसमेंट उतारा. |
| ०९. | आण्णाप्पा बसाप्पा कल्लोळे, चंद्रकांत आण्णाप्पा कल्लोळे यांचे मृत्यूचे दाखले. |
| १०. | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज यांना दिलेला बांधकामाबाबतचा अर्ज. |
| ११. | दिनांक ०९/०९/२०१९ रोजीचे ग्रामपंचायत मौजे हिडदूगी यांचेकडील दिलेले पत्र. |
| १२. | दिनांक २८/०१/२०१८ रोजीचे ग्रामपंचायत हिडदूगी यांना गट क्र.५०७ मध्ये बांधकाम करणेस परवानगी न देणेबाबतचे पत्र. |
| १३. | दिनांक १८/०२/२०२१ रोजीचे ग्रामपंचायत मौजे हिडदूगी यांचेकडील दिलेले पत्र. |
| १४. | बाळाप्पा चन्नाप्पा कळबसी यांचा मृत्यू दाखला. |
| १५. | भूमापन गट क्र.५०७ चा ७/१२ उतारा. |
| १६. | सर्व्हे क्र.७० चा ७/१२ उतारा. |
| १७. | मालमत्ता क्र.५१३/२ चा घरठाण पत्रकाचा उतारा. |
| १८. | गडहिंग्लज साखर कारखाना यांचेकडील ऊस वजनाच्या पावत्या. |
| १९. | दावा मिळकतीचे फोटो. |
| २०. | साक्षीदार आप्पा लक्ष्मण नाईक व विष्णू आप्पा निळवे यांची प्रतिज्ञापत्रे. |
| २१. | मालमत्ता क्र.५१३/1 चा घरठाण पत्रकाचा उतारा (सन २०१९-२० ते २०२२/२३). |
| २२. | ग्रामपंचायत हिडदूगी यांचेकडील घरफाळा भरलेबाबतच्या पावत्या. |

| | |
|---|---|
| २३. | मालमत्ता क्र.५१३/2 चा घरठाण पत्रकाचा उतारा (सन २०१९-२० ते २०२२-२३). |
| २४. | दिनांक ११/०२/१९८८ रोजीचे हमीपत्र. |
| २५. | श्री. विष्णू आप्पा निळवे यांचे प्रतिज्ञापत्र. |

५. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ नि.१७ व १९ सोबत खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** |
|---|---|
| ०१. | सर्व्हे क्र.११० चा सन १९५६ ते १९६६ व सन १९६६ ते १९७४ सालचे ७/१२ उतारे. |
| ०२. | फेरफार क्र.१२७५ व १३७३ चा डायरी उतारा. |
| ०३. | भूमापन क्र.५४५, ५४६, ५४७ चे एकत्रीकरणाचे उतारे. |
| ०४. | सर्व्हे क्र.५८२ चा गाव नकाशा. |
| ०५. | भूमापन क्र. ५४५, ५४६ व ५४७ चे सन १९८५-८६ ते १९९४-९५ सालचे ७/१२ उतारे. |
| ०६. | भूमापन क्र. ५४४ चा सन २०१८ ते २० सालचा ७/१२ उतारा. |
| ०७. | सर्व्हे क्र.५४४ चा नकाशा. |
| ०८. | खाते क्र. १०७४ चा ८-अ उतारा. |
| ०९. | गट क्र. ५४६ चा सन २०२०-२२ सालचा ७/१२ उतारा. |
| १०. | सर्व्हे क्र.५४६ चा नकाशा. |
| ११. | गट क्र. ५४५ चा सन २०१८-२० सालचा ७/१२ उतारा. |
| १२. | सर्व्हे क्र.५४५ चा नकाशा. |
| १३. | खाते क्र. १०६२ चा ८-अ उतारा. |
| १४. | गट क्र. ५४७ चा सन २०१९ ते २०२१ सालचा ७/१२ उतारा. |
| १५. | सर्व्हे क्र.५४७ चा नकाशा. |
| १६. | फेरफार क्र.९१५/अ चा डायरी उतारा. |
| १७. | फेरफार क्र.९१३ चा डायरी उतारा. |
| १८. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२०६ चा सन १९६१ ते १९६६ सालचा असेसमेंट उतारा. |
| १९. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२५२/२ चा सन १९७४ ते १९७८ सालचा असेसमेंट उतारा. |
| २०. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२७१/२ चा सन १९७९ ते १९८३ सालचा असेसमेंट उतारा. |

| | |
|---|---|
| २१. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२६३/२ चा सन १९८३ ते १९८७ सालचा असेसमेंट उतारा. |
| २२. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३१४ व ३१५ चा सन १९८७ ते १९९१ सालचा असेसमेंट उतारा. |
| २३. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३२४ चा सन १९९१ ते १९९६ सालचा असेसमेंट उतारा. |
| २४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३४४ चा सन १९९६ ते २००० सालचा असेसमेंट उतारा. |
| २५. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३७१ चा सन २००० ते २००४ सालचा असेसमेंट उतारा. |
| २६. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३७१/१ चा सन २००४ ते २००८ सालचा असेसमेंट उतारा. |
| २७. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६४/१ चा सन २००८ ते २०१२ सालचा असेसमेंट उतारा. |
| २८. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६१ चा सन २१२ ते २०१६ सालचा असेसमेंट उतारा. |
| २९. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६१ चा सन २०१५ ते २०१९ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३०. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६१ चा सन २०१९ ते २०२३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३१. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३७१/२ चा सन २००४ ते २००८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३२. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६४/२ चा सन २००८ ते २०१२ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३३. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६२ चा सन २०१२ ते २०१६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६२ चा सन २०१५ ते २०१९ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३५. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६२ सन २०१९ ते २०२३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३६. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२५२/१ चा सन १९७४ ते १९७८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३७. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२७१/१ चा सन १९७९ ते १९८३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३८. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६३/१ चा सन १९८३ ते १९८७ सालचा असेसमेंट उतारा. |
| ३९. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३१६/१ व ३१६/२ चा सन १९८७ ते १९९१ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४०. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३१३ सन १९८७ ते १९९१ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४१. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३२३ चा सन १९९१ ते १९९६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४२. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३२५ चा सन १९९१ ते १९९६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४३. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३४३ चा सन १९९६ ते २००० सालचा असेसमेंट उतारा. |

| | |
|---|---|
| ४४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३४५ चा सन १९९६ ते २००० सालचा असेसमेंट उतारा. |
| ४५. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३७० चा सन २००० ते २००४ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४६. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३७० चा सन २००४ ते २००८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४७. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६३ चा सन २००८ ते २०१२ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४८. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६३ चा सन २०१२ ते २०१६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ४९. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६० चा सन २०१२ ते २०१६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५०. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६० चा सन २०१५ ते २०१९ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५१. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६० चा सन २०१९ ते २०२३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५२. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२५२/३ सन १९७४ ते १९७८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५३. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२७१/३ चा सन १९७९ ते १९८३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२६३/३ चा सन १९८३ ते १९८७ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५५. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२०० चा सन १९६१ ते १९६६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५६. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२४८ चा सन १९७४ ते १९७८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५७. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२६६ चा सन १९७९ ते १९८३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५८. | ग्रामपंचायत मिळकत क्र.२६० चा सन १९८३ ते १९८७ सालचा असेसमेंट उतारा. |
| ५९. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३०२ चा सन १९८७ ते १९९१ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६०. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३१६ चा सन १९९१ ते १९९६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६१. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३३५ चा सन १९९६ ते २००० सालचा असेसमेंट उतारा. |
| ६२. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६२ चा सन २००० ते २००४ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६३. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३६२ चा सन २००४ ते २००८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३५५ चा सन २००८ ते २०१२ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६५. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३५१ चा सन २०१५ ते २०१९ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६६. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३५१ चा सन २०१९ ते २०२३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ६७. | खाते क्र.२७३ चा ९(३) ९(४) चा उतारा. |
| ६८. | गट क्र.५४४ चा सन १९८५ ते १९९६ सालचा ७/१२ उतारा. |
| ६९. | गट क्र.५४४ चा सन १९९६ ते २००६ सालचा ७/१२ उतारा. |
| ७०. | सर्व्हे क्र.४१ चा सन १९५६ ते १९६६ सालचा ७/१२ उतारा. |
| ७१. | सर्व्हे क्र.४१ चा सन १९६६ ते १९७४ सालचा ७/१२ उतारा. |
| ७२. | गट क्र.१९२ चा सन २०१७ ते २०१९ सालचा ७/१२ उतारा. |

| | |
|---|---|
| ७३. | सर्व्हे क्र.१९२ चा नकाशा. |
| ७४. | सर्व्हे क्र.७० चा सन १९५६ ते १९६६ सालचा ७/१२ उतारा. |
| ७५. | सर्व्हे क्र.७० चा सन १९६६ ते १९७४ सालचा ७/१२ उतारा. |
| ७६. | सर्व्हे क्र.५०७ चा सन १९७४ ते १९८३ सालचा ७/१२ उतारा. |
| ७७. | सर्व्हे क्र.५०७ चा सन १९८५ ते १९९४ सालचा ७/१२ उतारा. |
| ७८. | सर्व्हे क्र.५०७ चा सन १९९६ ते २००६ सालचा ७/१२ उतारा. |
| ७९. | फेरफार क्र.५० चा डायरी उतारा. |
| ८०. | किरकोळ अर्ज क्र.६९/१९९१ चे कामातील निशाणी क्र.१ व त्यावरील आदेशाची प्रत. |
| ८१. | किरकोळ अर्ज क्र.६९/१९९१ चे कामातील निशाणी क्र.१२ ची नक्कल. |
| ८२. | किरकोळ अर्ज क्र.६९/१९९१ चे कामातील निशाणी क्र.७ ची नक्कल. |
| ८३. | फेरफार क्र.६३५ चा डायरी उतारा. |
| ८४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३१५ चा सन १९७४ ते १९७८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ८५. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३४४ चा सन १९७९ ते १९८३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ८६. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३४१ चा सन १९८३ ते १९८७ सालचा असेसमेंट उतारा. |
| ८७. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४६० चा सन १९९६ ते २००० सालचा असेसमेंट उतारा. |
| ८८. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४९३ चा सन २००० ते २००४ सालचा असेसमेंट उतारा. |
| ८९. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४८७ चा सन २००४ ते २००८ सालचा असेसमेंट उतारा. |
| ९०. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४८२ चा सन २००८ ते २०१२ सालचा असेसमेंट उतारा. |
| ९१. | ग्रामपंचायत मिळकत क्र.३५१ चा सन २०१२ ते २०१६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ९२. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४८२ चा सन २०१२ ते २०१६ सालचा असेसमेंट उतारा. |
| ९३. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४८२ चा सन २०१५ ते २०१९ सालचा असेसमेंट उतारा. |
| ९४. | ग्रामपंचायत मिळकत क्र.४८२ चा सन २०१९ ते २०२३ सालचा असेसमेंट उतारा. |
| ९५. | कलाप्पा मल्लाप्पा नाईक, अर्चना विजय कुंभार व पार्वती गंगाप्पा मगदूम यांची प्रतिज्ञापत्रे. |
| ९६. | गट क्र.५०६ चा नकाशा. |
| ९७. | मो.र.नं. ४१३८ चा गट क्र.५०७ चा मोजणी नकाशा. |
| ९८. | पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांना पोलीस बंदोबस्त मिळणेबाबत दिलेला अर्ज. |
| ९९. | पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांनी दिलेले पत्र. |
| १००. | दावा मिळकतीचे फोटो व त्याचे बील. |

**प्रश्न क्रमांक १ ते ३ करिताः -**

६. वरील सर्व प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचेवर एकत्रीतपणे चर्चा करण्यात येत आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब होते. दावा मिळकत गट क्र.५०७ ही त्यांचे घराण्याची वडीलोपार्जीत मिळकत नाही. सदर मिळकत ही पूर्वी लिंगोजी देसाई यांचे मालकीची होती व कसण्यासाठी बाळाप्पा चनाप्पा कळबसी यांना दिली होती. सदर बाळाप्पा कळबसी हे वादी व प्रतिवादी यांचे घरी येऊन राहत होते व सदर मिळकत कसत होते. सदर बाळाप्पा कळबसी हे एकटेच होते व त्यांना कोणीही वारस नव्हते. त्यामुळे, ते वादी व प्रतिवादी यांचे घरी राहिलेमुळे त्यांची देखभाल वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार हे करु लागले व सदर मिळकत ते एकत्रात कसून वहिवाट करु लागले. बाळाप्पा कळबसी यांनी सदर मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार आण्णाप्पा, शिवाप्पा, बाळाप्पा व बाबूराव हया चौघा भावांनी समान वाटून घ्याव्या असे सांगितले होते. बाळाप्पा कळबसी यांनी त्यांचे हयातीत सदर मिळकतीबाबत कोणतेही कागद करुन दिलेले नव्हते. बाळाप्पा कळबसी मयत झालेनंतर आण्णाप्पा, शिवाप्पा व बाळाप्पा यांनी बाबूरावकडे सदर मिळकतीचे वाटणीबाबत विचारणा केली असता तो वाटणी करण्यास टाळाटाळ करु लागला.

७. दिनांक ११/०२/१९८८ रोजी आणाप्पा याने बाबूराव यास रक्कम रु. १०/- चे बंधपत्रावर पंचांसमक्ष हमीपत्र लिहून दिले की, गट क्र.५०७ मधील उत्तर बाजूची २७ आर जमीन पंचांनी त्याला वाटणीने दिली असल्यामुळे त्यामध्ये तो स्वखर्चाने बोअरवेल घेणार आहे. त्यानुसार आणाप्पाने बोअर मारुन सदर क्षेत्रात ऊसाचे पिक घेतले. त्यानुसार सदर क्षेत्र हे आणाप्पा व त्यानंतर वादी क्र.१ व २ यांचे कब्जेवहिवाटीस आहे व त्यामध्ये वादी क्र.१ व २ यांची घरे असून त्याची ग्रामपंचायतकडे नोंद आहे. सदर मिळकतीलगत २० आर क्षेत्र पंचांसमक्ष वादी क्र.३ चे पती शिवाप्पा यांस विभागून दिली असून सदर मिळकत ही शिवाप्पा हयात असेपासून वादी क्र.३ हिचे कब्जेवहिवाटीत आहे. प्रतिवादी यांची दावा मिळकतीमध्ये कधीही कब्जेवहिवाट नव्हती व मालकी हक्क देखील नव्हता. प्रतिवादी क्र.१ यांनी सनदी अधिकारी यांना हाताशी धरुन खोटया कागदपत्रांच्या आधारे आपले नांव दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी लावून घेतले आहे व त्याआधारे वादींना त्रास देत आहेत.

८. याऊलट, प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे घराण्याचे मुळ

पुरुष मयत झालेनंतर वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार यांनी वडीलार्जीत घर व शेत जमीनी हया पंचांसमक्ष सन १९६० चे दरम्यान वाटून घेतलेल्या असून तेव्हापासून विभक्त राहत आलेले आहेत. सदर वाटपाप्रमाणे ग्रामपंचायत व ७/१२ पत्रकी वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार यांचे नांवाची नोंद झालेली होती. त्यामुळे, वादी यांनी कथन केलेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब अस्तीत्वात नव्हते व नाही. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत नाही. सदर मिळकतीमध्ये बाळाप्पा कळबसी यांची कुळ नात्याची वहिवाट होती व त्यांनी जमीन मालक विरगोंडा लिगोंडा देसाई यांचेकडून आपसांत तडजोड करुन खरेदी कायम केली व ते मालक झाले. बाळाप्पा कळबसी हे प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांचे समवेत राहत होते व त्यावेळी त्यांची सर्व सेवासुश्रुषा ही प्रतिवादीचे पूर्वहक्कदार बाबूराव यांनी केली. बाळाप्पा कळबसी यांनी त्यांचे हयातीत दिनांक २७/०५/१९७४ रोजी मृत्यूपत्र करुन ठेवले होते व ते बाबूराव यांचेसोबत राहत असताना दिनांक ०२/०८/१९९० रोजी मयत झाले.

९. सदर मृत्यूपत्राद्वारे प्रतिवादींचे पूर्वहक्कदार बाबूराव यांनी प्रोबेट मिळणेकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला व तो दिनांक १७/१०/१९९२ रोजी मंजूर झाला. सदर आदेशानुसार ७/१२ पत्रकी फेरफार क्र.६३५ हा दिनांक २५/०२/१९९३ रोजी मंजूर झाला व तेव्हापासून दावा मिळकत ही प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांचे पुर्णपणे मालकीची झाली. बाबूराव कल्लोळी हे दिनांक १३/११/२०१६ रोजी मयत झाले व त्यानंतर त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मालक झाले. वादी अथवा त्यांचे पूर्वहक्कदार यांचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्कसंबंध अथवा अधिकार नव्हता व नाही. वादी यांचे दावा मिळकतीमध्ये नमुद प्रमाणे कोणतेही घर नसताना ग्रामपंचायत दप्तरी बेकायदेशिर घराची नोंद केलेली आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी ग्रामपंचायतीमध्ये सदर नोंद कमी करणेबाबत कळविले आहे. दावा मिळकतीमध्ये बाळाप्पा कळबसी हे कसत असलेपासून घर, विहीर व बोअर आहे व ते मयत झालेनंतर त्याची मालकी प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबूराव व त्यांचे मृत्यूनंतर प्रतिवादी यांची मालकी व कब्जेवहिवाट आहे.

१०. दोन्ही बाजुंचे कथन, दाखल दस्त व करण्यात आलेल्या युक्तीवादानुसार मिळकत गट क्र.५०७ ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत नसून बाळाप्पा कळबसी यांचे मालकीची असल्याचे दिसुन येते. वादींच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार हे

चार भाऊ होते व त्यांनी एकत्रीतपणे बाळाप्पा कळबसी यांची सेवासुश्रुषा केलेमुळे त्यांनी सदर बाळाप्पा कळबसी यांची मिळकत ही चौघा भावांमध्ये समान वाटून घ्यावी असे सांगितले. त्यानुसार, पंचांसमक्ष त्यांचे दरम्यान सदर मिळकतीची वाटणी झाली व दावा मिळकत ही वादी यांचे हिश्याला येऊन त्यांचे कब्जेवहिवाटीत आहे. याऊलट, प्रतिवादींचे कथनाप्रमाणे सदर बाळाप्पा कळबसी यांची सेवासुश्रुषा ही केवळ त्यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांनी केली असून बाळाप्पा कळबसी यांनी त्यांचे हयातीत मृत्यूपत्र करुन ठेवले होते. बाळाप्पा कळबसी हे मयत झालेनंतर सदर मृत्यूपत्राआधारे प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांनी प्रोबेट मिळविले असून त्याआधारे ते सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याने त्यांचे वारस म्हणुन प्रतिवादी हे मालक व कब्जेदार आहेत.

११. सदर दोन्ही बाजुंच्या कथनाच्या पुष्टयर्थ दाखल दस्तांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीतर्फे दाखल दिनांक ११/०२/१९८८ रोजीचे हमीपत्र हे वादींचे पूर्वहक्कदार आणाप्पा यांनी प्रतिवादींचे पूर्वहक्कदार बाबूराव यांना लिहून दिलेले आहे. प्रतिवादींनी सदर हमीपत्र हा खोटा असून त्यावर त्यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांनी स्वाक्षरी केलेली नसल्याचे कथन केले आहे. सदर हमीपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर हमीपत्रानुसार मिळकत गट क्र.५०७ मध्ये आणाप्पा यांचे भावकी व पंचांचे सल्ल्यानुसार वाटणी होऊन त्यांना २७ आर क्षेत्राची जमीन दिली व त्यामध्ये त्यांनी स्वखर्चाने बोअर घेतला आहे. सदर हमीपत्रासंदर्भात वादींनी साक्षीदार आप्पा लक्ष्मण नाईक यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. आप्पा लक्ष्मण नाईक यांचे शपथपत्रानुसार सदर हमीपत्र लिहिणेकरीता रक्कम रु.१०/- चे बंधपत्र त्यांनी खरेदी केले होते व त्यातील मजकुर हा त्यांचेसमक्ष लिहिणेत आला व त्यावर आणाप्पा, बाबूराव व साक्षीदार यांनी त्यांचेसमक्ष सहया केल्या होत्या व त्यानुसार वादींचे पूर्वहक्कदार यांची कब्जेवहिवाट होती.

१२. याठिकाणी ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे की, दिवाणी प्रक्रिया सहिंता आदेश ३९, कलम १ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्जाचेवेळी पक्षकारांतर्फे दाखल शपथपत्र व इतर बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. त्यानुसार, सदर वादीतर्फे दाखल साक्षीदाराच्या शपथपत्रानुसार दिनांक ११/०२/१९८८ रोजीचे हमीपत्राचे अवलोकन केले असता सदर हमीपत्राचे रक्कम रु. १०/- चे बंधपत्र हे सदर साक्षीदार आप्पा लक्ष्मण नाईक यांनी खरेदी केल्याचे दिसून येते. तशी सदर रक्कम रु. १०/- चे बंधपत्रावर साक्षीदार यांचे

नांवाची नोंद असून त्यांची सही आहे. त्यामुळे, याघडीला वर नमुद तरतुदी प्रमाणे सदर साक्षीदाराचे शपथपत्र हे विचारात घेता येईल. सदर शपथपत्रानुसार प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांनी सदर हमीपत्रावर स्वाक्षरी केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर हमीपत्राचे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबूराव यांचे नांवासमक्ष स्वाक्षरी झालेली असल्याचे दिसून येते. याशिवाय, सदर दस्त हे सन १९८८ सालचे असुन ३० वर्षापेक्षा जास्त जुने आहे. तसेच, सदर दस्त हे वादींचे पुर्वहक्कदार यांनी लिहुन दिलेले असुन सदर दस्त हे वादींनी दाखल केलेला आहे. त्यामुळे, सदर हा योग्य ताब्यातुन हजर करण्यात आलेला आहे. सबब, सदर दस्तास भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणे गृहीतक देखील आहे. त्यामुळे, सदर हमीपत्र हे दिनांक ११/०२/१९८८ रोजी करण्यात आल्याचे व त्यामध्ये नमुद प्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांचे दरम्यान वाटणीबाबत व वादींचे पुर्वहक्कदार यांना मिळकत गट क्र.५०७ मध्ये वाटणीने क्षेत्र देवुन त्यामध्ये बोअर केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१३. याव्यतिरिक्त, वादींतर्फे दाखल करण्यात आलेले ग्रामपंचायत मिळकत क्र.५१३/१ व ५१३/२ चे घरठाण उताऱ्याचे अवलोकन केले असता त्यावर वादींची नावे नमुद असल्याचे दिसुन यते. प्रतिवादींतर्फे कथन करण्यात आहे की, सदर ग्रामपंचायत दफ्तरी झालेल्या नोंदी ह्या बेकायदेशिर असुन त्याबाबत त्यांनी ग्रामपंचायत, हिडदुगी यांना कळविलेले आहे. त्यासंदर्भात, वादीतर्फे दाखल दस्तांचे अवलोकन केले असता वादींनी प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत, हिडदुगी यांना दिलेले तक्रारी अर्ज व त्याअनुषंगाने ग्रामपंचायत, हिडदुगी यांनी वादींना दिलेले पत्र अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

१४. सदर तक्रारी अर्जांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी अशी तक्रार दिलेली आहे की, गट क्र.५०७ ही मिळकत त्यांचे मालकीची असुन त्यावर आण्णाप्पा यांचे नाव सन २००२ सालापासुन व त्यांचेनंतर वादींचे नाव बेकायदेशिर नोंदविण्यात आलेले आहे. तसेच, सदर मिळकतीच्या घरठाण पत्रकी घराची नोंद आहे व सदर घर हे त्यांची शेती गट क्र.५०७ मध्ये आहे. सदर घराचे बांधकाम करणेसाठी किंवा त्याचे नावे जागा करणेसाठी त्यांनी अथवा त्यांचे वडिलांनी कोणतीही संमती दिलेली नव्हती. प्रतिवादी क्र.१ यांनी दिलेल्या तक्रारी अर्जांवरुन दावा मिळकतीचे घरठाण पत्रकी सन २००२ सालापासुन वादींचे पुर्वहक्कदार आण्णाप्पा यांचे नावाची नोंद असल्याचे व

सदर मिळकत क्र.५०७ मध्ये घर असुन त्यावर वादींची नावे नमुद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१५. प्रतिवादी यांनी सदर नावे ही बेकायदेशिर नमुद झाल्याचे कथन केलेले आहे. परंतु, अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरुन सदर प्रतिवादी क्र.१ यांनी तक्रारी अर्ज दिलेनंतर दिनांक ०९/०९/२०१९ व १८/०२/२०२१ रोजी ग्रामपंचायत, हिडदुगी यांनी वादींना त्याचेकडे सदर मिळकती संदर्भात काही कागदपत्रे अथवा कोणती हरकत असल्यास त्यांना कळविण्यास सांगितलेले आहे. सदर ग्रामपंचायत, हिडदुगी यांनी वादींना माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये कळविलेनंतर ग्रामपंचायत, हिडदुगी यांनी सदर नाव कमी केल्याचे दर्शविण्याकरिता कोणताही दस्त दावा दाखल करेपावेतो अथवा आजपावेतो दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे, सदर नोंदी ह्या बेकायदेशिर आहेत अथवा कसे हे याघडीला शाबित झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, एकंदरित दावा मिळकतीमध्ये पुर्वी वादींचे पुर्वहक्कदार यांची व त्यांनतर वादींची कब्जेवहीवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१६. प्रतिवादींचे कथनानुसार दावा मिळकत ही बाळाप्पा कळबसी यांनी केलेल्या मृत्युपत्राआधारे झालेले प्रोबेटनुसार प्रतिवादींचे पुर्वहक्कदार बाबुराव यांचे मालकीची झालेली आहे. त्याबाबत, प्रतिवादींनी मा. दिवाणी न्यायालय वरिष्ट स्तर, कोल्हापुर यांचेकडे दाखल अर्ज व त्यावरिल आदेश दाखल केलेले आहे. त्यानुसार, मिळकत गट क्र.५०७ चे बाळाप्पा कळबसी यांचे मृत्युपत्राआधारे प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार बाबुराव यांचे नावे प्रोबेट जारी करण्यात आल्याचे दिसुन येते. सदर आदेश हा आव्हानित झालेला असल्याचे दाखल कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यामुळे, सदर आदेशानुसार मिळकत गट क्र.५०७ वर प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार बाबुराव यांचे नाव दाखल असल्याचे दिसुन येते. परंतु, दावा मिळकतीचे सदर आदेशाआधारे मालकी सदरी बाबुराव यांचे नाव नमुद असल्याचे जरी प्रथमदर्शनी दिसुन येत असले तरी, वरनमुदप्रमाणे कब्जेवहीवाट ही प्रथमदर्शनी वादींची असल्याचे दिसुन येते. प्रतिवादींचे कथनानुसार सदर कब्जेवहिवाट ही बेकायदेशिर आहे अथवा कसे ही बाब पुराव्यानिशी दाव्याच्या अंतिम निकालाचेवेळी ठरविता येणार आहे. परंतु, कायद्याचे हे प्रस्थापित तत्व आहे की, ताबा हा कायदेशिर असो अथवा नसो, त्याला कायदेशिर प्रक्रिया अवंलबलेशिवाय हरकत अडथळा करता येत नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांना वादींचे कब्जेवहिवाटीस कोणतीही कायदेशिर प्रक्रिया अवलंबलेशिवाय हरकत अडथळा

करता येणार नाही.

१७. वादींतर्फे वकीलांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतलेला आहे-

01. *Ravinder Kaur Grewal & Ors. Vs. Manjit Kaur & Ors., Civil Appeal No. 7764/2014,*
02. *Smt. Sarladevi Widow of Kundanlal Bandawar Vs. Shailesh s/o Gourishankar Namdeo, AIR 1996 Bombay 98,*
03. *Ganikhan & ors. Vs. Amanabai & ors., AIR 1982 Madhya Pradesh 190,*
04. *Karthiyayani Amma Vs. Govindan AIR 1980 Kerala 224.*

१८. सदर वादींतर्फे दाखल *Ravinder Kaur Grewal* या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निरिक्षण दिले आहे की, वादीला तो गैरहक्काने (Adverse possession) मालक झाला असे कथन करुन दावा दाखल करता येतो. प्रस्तुत दावा हा वादीने गैरहक्काने मालकी बाबत दाखल केलला आहे. त्यामुळे, सदर न्यायनिर्णयानुसार प्रस्तुत दावा हा चालण्यास पात्र आहे. याव्यतिरिक्त, वादीतर्फे दाखल इतर तिनही न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये मा. न्यायालयाने असे निरिक्षण दिले आहे की, ज्यावेळी एखादा व्यक्ती हा त्याला मालकी हक्क असताना अथवा नसताना एखादया मिळकतीच्या ताब्यामध्ये असतो, त्यावेळी त्याला मनाई हुकूमाकरीता दावा दाखल करता येतो. तसेच, सदर दावा हा मुळ मालकाव्यतिरिक्त देखील दाखल करता येतो व मुळ मालकास सदर व्यक्तीला बळाचे आधारे बेकब्जा करता येणार नाही. प्रस्तुत दाव्यात वर कथन केल्याप्रमाणे वादी हे दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने त्यांचा दावा हा मनाई हुकूमाकरीता प्रतिवादी यांचेविरुध्द चालणेस पात्र आहे.

१९. याऊलट, प्रतिवादींतर्फे वकीलांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतलेला आहे-

01. Mallikarjunaiah Vs. Nanjaiah, Laws (SC) 2019 4 122,
02. Dagadabai (Dead) By L.Rs. Vs. Abbas @ Gulab Rustum Pinjari, Laws (SC) 2017 4 80.
03. Ramesh Gupta Vs. Kanta Gupta, Laws(DLH) 2015 2 247.

२०. सदर प्रतिवादींतर्फे दाखल तिनही न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये मा. न्यायालयाने असे निरिक्षण दिले आहे की, दावा गैरहक्काने दाखल केलेला असल्यास तो कोणत्या स्थितीमध्ये चालणेस पात्र आहे. वर नमुद केलेप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे *Ravinder Kaur Grewal* या न्यायनिर्णयातील निरिक्षणानुसार वादीस गैरहक्काने मालक झाल्याचे हक्कज्ञापन मिळणेकरीता दावा दाखल करता येतो. त्यामुळे, प्रस्तुत दावा हा गैरहक्काने मालकी हक्काबाबत दाखल असून त्यामध्ये प्रतिवादी यांनी घेतलेले आक्षेप हे दोन्ही बाजुंतर्फे दाखल पुराव्याचे आधारे गुणदोषावर ठरणार आहेत. त्यामुळे, सदर बाब ही प्रस्तुत अर्जाचे वेळी जो वर नमुद वादींतर्फे दाखल न्यायनिर्णयानुसार चालणेस पात्र असताना विचारात घेता येणार नाही. सदर न्यायनिर्णय हे दाव्याचे गुणदोषावर अंतिम निकालाचेवेळी विचारात घेता येतील.

२१. एकंदरित, दोन्ही बाजुंतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवाद, दाखल कागदपत्रांवरुन दावा मिळकतीमध्ये वादींची कब्जेवहिवाट असल्याचे व त्यास प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, वादींच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच, वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी सदर हजरक अडथळा करित राहील्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादी यांचा दावा मिळकतीत असलेले हक्क व अधिकार हे प्रस्तुत दाव्यात आव्हानित असल्यामुळे व दावा मिळकत त्यांचे कब्जेवहीवाटीत नसल्यामुळे, त्यांचेविरुध्द वादींनी मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकुम दिल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून माझे मते न्यायिक समतोल हा वादींच्या लाभात आहे. सबब, मी प्रश्न क्र.१ ते ३ चे होकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ४ करिताः</u>**-

२२. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता वादींनी मागणी केलेप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवरिल वादींचे कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करु नये असा मनाई हुकुम मिळणेस वादी पात्र आहेत. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता, प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी यांनी दावा मिळकत ज्याचे वर्णन दाव्यातील परिच्छेद-१ मध्ये नमुद आहे त्यावर स्वतः अथवा त्यांचे मार्फत इतर कोणीही वादींच्या दावा मिळकतीच्या शांतामय कब्जेउपभोगास दाव्याचा निकाल लागेपर्यत हरकत अडथळा करु नये असा त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

०३. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.05.08 17:22:47 +0530

दिनांकः ०६/०५/२०२३.
गडहिंग्लज.

**( एस.ए.राठोड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R.D.Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 06/05/2023 |
| Order signed by P.O. on | 06/05/2023 |
| Order uploaded on | 08/05/2023 |